**ठळक बातम्या**

आर्थिक आणि व्यापारी भागिदारी आणखी बळकट करण्यासाठीच्या पंचवार्षिक कार्यक्रमावर भारत आणि रशियात सहमती

नगरपंचायती आणि नगरपरिषदांची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्यावर सर्वोच्च न्यायालय ठाम

शेतकऱ्यांना सौरऊर्जा पुरवण्यासाठी राज्य सरकार स्वतंत्र कंपनी स्थापन करणार

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया सुरू

**आणि**

रिझर्व्ह बँकेकडून व्याजदरात पाव टक्क्याची कपात, बँकांकडूनही ग्राहकांना सवलत द्यायला सुरुवात

**<><><><><>**

आर्थिक आणि व्यापारी भागिदारी आणखी बळकट करण्यासाठी भारत आणि रशियात आज वर्ष २०३० पर्यंतच्या आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर सहमती झाली. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा केल्यानंतर संयुक्त निवेदनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ही घोषणा केली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड कॅप्सूल - -**

*(गेल्या ८ दशकांपासून भारत आणि रशियामध्ये संबंध असून ते अधिकाधिक बळकट होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. दोन्ही देशातल्या आर्थिक सहकार्य करारानं हे संबंध आणखी दृढ होतील असं ते म्हणाले*

***- - होल्ड - प्रधानमंत्री (३चा बाइट) - -***

*कृषी आणि खत निर्मिती क्षेत्रात आणखी सहकार्य करण्यावर दोन्ही देश तयार झाले आहेत. संयुक्तरित्या युरिया उत्पादनासाठी दोन्ही देशात प्रयत्न करणार असल्याचं ते म्हणाले. युरेशियन आर्थिक महासंघासोबतचा मुक्त व्यापार पूर्ण करण्याची भारताची तयारी आहे. रशियाचा नागरिकांना लवकरच ३० दिवसाचा ई-पर्यटन विसा आणि ३० दिवसांचा समूह पर्यटन विसा दिला जाईल, अशी घोषणाही प्रधानमंत्र्यांनी केलं.*

*दहशतवादाच्याविरोधात काम करण्यासाठी दोन्ही देश तयार आहेत. शिवाय युक्रेनचा मुद्दा शांततापूर्ण मार्गाने निकाली निघावा यासाठी होत असलेल्या सर्व प्रयत्नांना भारत पाठिंबा देईल, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.*

*होल्ड - बाइट प्रधानमंत्री युक्रेन*

*संरक्षण, अर्थव्यवस्था, व्यापार आणि संस्कृतीच्या क्षेत्रात सहकार्य करण्याला प्राधान्य देण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली आहे. वार्षिक व्यापार १०० अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत वाढवण्यावरही सहमती झाल्याची माहिती पुतीन यांनी दिली. भारताला इंधनाचा अखंड पुरवठा करण्यासाठी तसंच ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याची तयारीही रशियानं दाखवली.*

*यावेळी संरक्षण, व्यापार, अर्थव्यवस्था, आरोग्य, शिक्षण, संस्कृती आणि प्रसारमाध्यम क्षेत्राशी निगडीत १६ करारांची दोन्ही देशांमध्ये देवाणघेवाण झाली.*

*त्यानंतर दोन्ही नेत्यांनी भारत-रशिया बिझनेस फोरमला संबोधित केलं. २०३० पूर्वी द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलरचा टप्पा गाठेल असा विश्वास मोदी यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी त्यांनी भारतात उद्योग स्थापन करण्यासाठी रशियन व्यावसायिकांना आमंत्रण दिलं. भारतातून अनेक वस्तूंची खरेदी वाढवण्यासाठी रशियन कंपन्या उत्सुक असल्याचं पुतिन यावेळी म्हणाले.)*

**<><><><><>**

राज्यात २ डिसेंबर रोजी झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होईल, त्याआधी नाही, असं आज सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करणं बंधनकारक असून कोणत्याही परिस्थितीत त्या पुढे ढकलल्या जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देशही सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं दिले.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व शेतकऱ्यांना सौरऊर्जा पुरवण्यासाठी पुढच्या वर्षीच्या शेवटपर्यंत एक वेगळी वीजकंपनी स्थापन करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. 'मागेल त्याला सौर कृषीपंप' या योजनेअंतर्गत

एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौरकृषीपंप लावण्याच्या, राज्यानं केलेल्या विश्वविक्रमाचं प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं स्वीकारलं, या कार्यक्रमात ते बोलत होते.

***होल्ड… बाईट- देवेंद्र फडणवीस***

गिनीज बुकच्या प्रतिनिधींनी हे प्रमाणपत्र देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केलं. महाराष्ट्राचा हा विक्रम आम्हीच मोडू, असा विश्वास यावेळी फडणवीस यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांच्या माहितीत विसंगती आढळून आल्याने संशयित कुटुंबांची आणि अल्पवयीन लाभार्थ्यांची पडताळणी करण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. एकाच कुटुंबातले एकापेक्षा अधिक सदस्य लाभार्थी असणं, चुकीची माहिती देऊन दिशाभूल करणं असे प्रकार घडल्याने अशा लाभार्थ्यांचे लाभ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आले आहेत. बीड जिल्ह्यामध्ये पाटोदा तालुक्यात ४३ संशयित लाभार्थी असून या सर्व प्रकरणांची तपासणी करण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले आहेत.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरामध्ये पाव टक्का कपात केली आहे. यामुळे आता नवीन रेपो दर सव्वा पाच टक्के झाला आहे. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज चालू आर्थिक वर्षातला पाचवा पतधोरण आढावा जाहीर केला, त्यावेळी ही घोषणा केली. अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(महागाईचा कमी झालेला दर आणि वाढलेली मागणी यांच्या आधारावर आज व्याजदर कपात केल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. यामुळे गृहनिर्माण, वाहन आणि व्यावसायिक कर्जांसह विविध कर्ज स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. इतरही दर कायम ठेवण्याचा निर्णय पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत आज झाला.*

*गेल्या तिमाहीत आर्थिक वृद्धीदरात झालेली वाढ, जीएसटीतली कपात, सणासुदीच्या काळात नागरिकांनी केलेली खरेदी या जोरावर देशाचा आर्थिक वृद्धी दर आणखी वाढेल, अशी आशा रिझर्व्ह बँकेनं व्यक्त केली. त्यामुळं चालू ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील असा*

*अंदाज बँकेनं व्यक्त केला. दोन महिन्यापूर्वी हा दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्के राहिल असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं होतं. सलग दुसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं जीडीपीच्या अंदाजात सुधारणा केली आहे. त्याचवेळी सलग दुसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं किरकोळ चलनवाढीच्या दराचा अंदाज कमी केला आहे. आता हा दर चालू आर्थिक वर्षात २ टक्के राहील, असं बँकेचं म्हणणं आहे. बाजारातली भांडवली उपलब्धता पाहता रिझर्व्ह बँकेनं १ लाख कोटींचे सरकारी रोखे खुल्या बाजारपेठेतून खरेदी करण्याचाही निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेच्या लोकपालाकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी १ जानेवारीपासून २ महिन्यांची विशेष मोहिम राबवणार असल्याची घोषणाही गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज केली. त्याचवेळी ग्राहकांच्या सुविधेकडे विशेष लक्ष द्यावं आणि त्यांच्या तक्रारी कमी होतील, याची काळजी घेण्याची सूचना त्यांनी बँका आणि वित्तीय संस्थांना केली. )*

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या व्याजदर कपातीनंतर बँक ऑफ बडोदानंही विविध व्याजदरात पाव टक्क्यांची कपात केली. त्यामुळं बँक ऑफ बडोदाचा रेपो आधारित व्याजदर ७ पूर्णांक ९ दशांश टक्के झाला. या निर्णयामुळं शेअर बाजारातही तेजी दिसून आली. सेन्सेक्समध्ये आज ४४७ अंकांची वाढ झाली आणि तो ८५ हजार ७१२ अंकांवर बंद झाला. निफ्टी देखील १५३ अंकांची वाढ नोंदवून २६ हजार १८६ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

इंडिगो कंपनीच्या विस्कळीत विमानसेवेमुळे निर्माण झालेली परिस्थिती लवकरच नियंत्रणात येऊन उद्यापर्यंत परिस्थिती सामान्य होईल. तसंच येत्या तीन दिवसांत विमानसेवा पूर्वपदावर येईल, असं नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं म्हटलं आहे. विमान सेवा कालमर्यादेचा आदेश नागरी विमान वाहतूक संचालनालयानं तात्काळ प्रभावाने स्थगित केला आहे. विमान कर्मचाऱ्यांनी घेतलेली आजारपणाची रजा किंवा विशेषाधिकार रजा त्यांच्या अनिवार्य साप्ताहिक विश्रांती कालावधीत घेतलेली रजा म्हणून मोजायला मनाई करणारा नियम नागरी विमान वाहतूक संचालयानं मागे घेतला आहे. यासर्व प्रकाराची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारनं एक उच्चस्तरीय चौकशी समितीही स्थापन केली आहे.

प्रवाशांची गैरसोय काही प्रमाणात कमी व्हावी यासाठी रेल्वेगाडयांना अतिरिक्त डबे जोडण्यात आले आहेत.

<><><><><>

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं बँक फसवणूक प्रकरणी रिलायन्स अनिल अंबानी समूहाच्या १ हजार १२० कोटी रुपयांच्या १८ हुन अधिक मालमत्ता तात्पुरत्या स्वरुपात जप्त केल्या. यामध्ये मुदत ठेवी, बँक बॅलन्स आणि काही समभागांचा समावेश आहे.

<><><><><>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर चैत्यभूमीवर अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांना बृहन्मुंबई महानगरपालिकेनं विविध सेवा सुविधा पुरवल्या आहेत. चैत्यभूमी, शिवाजी पार्क, 'राजगृह' यासह आवश्यक ठिकाणी अनुयायांसाठी निवारा, प्रसाधनगृहं, सुरक्षा, आरोग्य आदींची चोख व्यवस्था आहे. चैत्यभूमीतल्या आदरांजलीचं मोठ्या पडद्यांवर, तसंच महानगरपालिकेच्या विविध समाजमाध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे. अनुयायांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे अतिरीक्त लोकल आणि विशेष गाड्याही चालवत आहे.

<><><><><>

बाजार समिती कायदा रद्द करावा त्याचप्रमाणे सर्वांना समान कायदा करण्याबरोबरच १९६३ च्या जुन्या कायद्यात आमूलाग्र बदल करा या मागणीसाठी व्यापाऱ्यांनी पुकारलेल्या बंदला आज राज्यात संमिश्र प्रतिसाद मिळाला. मुंबईत एपीएमसीमधलं दाणा मार्केट बंद होतं. जळगावमधले मात्र सर्व व्यवहार बंद होते.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेनुसार राज्यात महायुतीचं सरकारचं काम सुरू आहेत. शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि उद्योगांना सरकार बळ देत असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. ते मुंबईत महायुती सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. सरकारनं घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

राज्यातल्या महायुती सरकारची वर्षपूर्ती झाली तरी जनतेच्या पदरी मात्र निराशाच पडली आहे, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज नागपुरात केली.

सरकारनं हिवाळी अधिवेशनात एक वर्षाच्या कामाची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

<><><><><>

कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरच्या आंबा घाटात आज पहाटे खासगी बस  खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३७ जण जखमी झाले आहेत. त्यातल्या ८ जणांची प्रकृती गंभीर आहे.

<><><><><>

राज्यात काल गोंदिया इथं १० पूर्णांक ४ अंश सेल्सिअस इतकं सर्वात कमी तापमान नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//